परीक्षा समन्वय कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in


# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)


Exam Co-ordination Section
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in


संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय /227

दिनांक : 12/08/२०२५

## परिपत्रक

मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नीत सर्व औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था (पदव्युत्तर अभ्यासक्रम) यांना कळविण्यात येते की एप्रिल/मे २०२५ परीक्षेपासून औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (एम.फार्म. प्रबंध) (**M.Pharm Dissertation**) मूल्यमापनासाठी बहि:स्थ परीक्षक नेमणूकीच्या (**Appointment of external examiner**) प्रचलित पारंपारिक पध्दती ऐवजी ऑनलाईन पध्दतीने प्रक्रिया करण्यात येत आहे. यासंदर्भात दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी झूम ॲपवर मा.अधिष्ठाता (विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) यांच्या अध्यक्षतेखाली औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या सर्व अभ्यासमंडळाच्या अध्यक्षांची बैठक आयोजित करण्यात येवून, सदर बैठकी मध्ये झालेल्या चर्चेनुसार प्रबंध मूल्यमापनासंबंधी ऑनलाईन पध्दतीच्या अनुषंगाने विद्यापीठाने वेळोवेळी निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार कालमर्यादेत प्रबंध मूल्यमापन प्रक्रिया होवून विहीत कालावधीत निकाल जाहीर करण्यासाठी खालील प्रमाणे सूचना निर्गमीत करण्यात येत आहेत.

१. औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रबंध (**M.Pharm Dissertation**) मूल्यमापन एप्रिल/मे २०२५ परीक्षेपासून ऑनलाईन पध्दतीने बहि:स्थ परिक्षक (**External Examiner**) नेमणूक करण्यात येईल.

२. सदर अभ्यासक्रमाच्या प्रबंध मूल्यमापनासाठी प्रत्येक महाविद्यालयाने प्रत्येक विद्यार्थ्यासाठी तीन परीक्षकांची नावे (**Proposed Examiners**) सविस्तर तपशीलासह ऑनलाईन पध्दतीने दिलेल्या तक्त्यात (**Format**) वेळेत भरणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक शिक्षकास/मार्गदर्शकास कमाल ०६ विद्यार्थी मान्य असतील.

४. विद्यार्थ्यांनी पब्लीकेशन प्रसिध्द केलेले असल्यास संबंधित ठिकाणी दर्शविलेल्या टॅबवर अपलोड करावे.

५. महाविद्यालयाकडून ऑनलाईन पध्दतीने बहि:स्थ परीक्षकांची नावे प्राप्त झाल्यानंतर खालील पध्दतीने प्राधान्यक्रम निश्चित केला जाईल.

क. संबंधित अभ्यासमंडळाचे अध्यक्ष – महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली परीक्षकांची नावे कायम ठेवणे/त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार त्यांना राहतील. अध्यक्ष, संबंधित विषयाचे अभ्यासमंडळ यांनी त्यांच्या लॉगीनमधून त्यांना प्राप्त झालेल्या तारखेपासून पुढील दोन दिवसात त्या नावांमध्ये बदल करणे/कायम ठेवणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८ ३(**a**) (**iv**) मधील तरतूदीनुसार दोन सदस्यांनी त्यांच्याकडील नावे संबंधीत अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांचेकडे कळवावीत.

ख. मा.अधिष्ठाता – संबंधीत अभ्यासमंडळाचे अध्यक्ष यांनी त्यांच्या लॉगीन मधून वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार आवश्यक ती कार्यवाही केल्यानंतर संबंधीत विद्याशाखेचे अधिष्ठाता यांनी त्यांच्या लॉगीनमध्ये नावे प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसात सदर परीक्षकांच्या नावात बदल करणे/कायम ठेवणे आवश्यक आहे.

ग. मा. प्र–कुलगुरु – मा. अधिष्ठाता यांच्या लागीन मधून आवश्यक ती कार्यवाही केल्यानंतर मा. प्रकुलगुरु यांनी त्यांच्या लॉगीनमध्ये बहि:स्थ परीक्षकांची नावे प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसात सदर परीक्षकांच्या नावास मान्यता देणे आवश्यक आहे.

घ. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ – वरील क्रमानुसार संबंधीतांनी त्यांच्या लॉगीनमधून कार्यवाही केल्यानंतर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या लॉगीनमध्ये बहि:स्थ परीक्षकांची नावे प्राप्त झाल्यानंतर पुढील दोन दिवसात सदर परीक्षकांच्या नावास प्राधान्यक्रम

देवून संबंधीत बहि:स्थ परीक्षकांची नियुक्ती १, २ व ३ या पसंतीक्रमानुसार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेकडून संबंधीत महाविद्यालेयास कळविण्यात येतील.

च. संबंधीत महाविद्यालये – प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावासमोर प्राधान्यक्रमानुसार देण्यात आलेल्या परीक्षकांच्या प्राधान्यक्रमांकानुसार क्रमांक १ वरील परीक्षकास संबंधीत महाविद्यालयाने बोलवावे. अनु. क्रमांक १ वरील परीक्षक त्या वेळेत उपलब्ध नसल्यास त्यापुढील क्रमांक २ आणि अनु. क्रमांक १ व २ नुसार परीक्षक त्या वेळेत उपलब्ध नसल्यास अनु. क्रमांक ३ वरील परीक्षकास बोलावून विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे नमूद केलेल्या सर्व संबंधित अधिकारमंडळातील अधिकारी/सदस्य यांनी त्यांच्या लॉगीन मधून त्यांना नावे प्राप्त झाल्यापासून दोन दिवसात आवश्यक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. अन्यथा क्रमाने सदरची नावे पुढील अधिकार मंडळाच्या/अधिका–याच्या लॉगीनमध्ये स्वयंचलीत पध्दतीने (Automated system) पाठविली जातील.

छ. महाविद्यालय स्तरावर प्रबंध मूल्यमापन झाल्यानंतर विद्यापीठाच्या संबंधीत लिंक वर सर्व विद्यार्थ्यांचे गुण निर्धारित वेळेत महाविद्यालयांच्या संबंधीतांनी भरावेत.

आपला,

प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई
प्रभारी संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

परीक्षा समन्वय कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.: ०२०-२५६२१४४०
ई-मेल आयडी:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Exam Co-ordination Section
Ganeshkhind, Pune 411 007.
Phone No.: 020-25621440
E-mail Id.:
ar.coordination@pun.unipune.ac.in
coe@unipune.ac.in
Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र. परीक्षा/समन्वय/७००

दिनांक : १२/८/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व औषधनिर्माणशास्त्र (पदव्युत्तर अभ्यासक्रम) संलग्न महाविद्यालये,
(पुणे, अहिल्यानगर, नाशिक जिल्हा)

विषय —एम.फार्म प्रबंध (M.Pharm Dissertation) परीक्षा एप्रिल / मे २०२५ मूल्यमापनाबाबत.
संदर्भ — परीपत्रक क्र. परीक्षा / समन्वय / २२७ दि. १२ / ०८ / २०२५.

महोदय / महोदया,

वरील विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, एम.फार्म प्रबंध (M.Pharm Dissertation) मूल्यमापनासाठीची प्रक्रीया ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्यासाठी विद्यापीठाने सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव एप्रिल / मे २०२५ च्या परीक्षेपासून ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्याचे निश्चित झाले आहे. सदर प्रस्ताव सर्व महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीनेच भरावेत. **त्याची छापील प्रत (Printed Copy) विद्यापीठाकडे जमा करण्याची आवश्यकता नाही.**

सदर प्रस्ताव विहीत केलेल्या प्रारुपात ऑनलाईन भरण्याबाबतची लिंक खालीलप्रमाणे आहे. सदर लिंकवर दिनांक १३ ते २० ऑगस्ट, २०२५ पर्यंत माहिती भरावी. सदर कालावधीमध्ये माहिती न भरल्यास महाविद्यालयांना मुदत वाढवून दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

एम.फार्म प्रबंध (M.Pharm Dissertation) मूल्यमापन **प्रस्ताव ऑनलाईन भरण्याबाबतची लिंक — https://dissertation.unipune.ac.in**

कळावे,

आपला,

प्रा.(डॉ.) प्रभाकर देसाई
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ